आरोग्य कार्यकारी अधिकारी पदावर दिनांक ३१/१२/२०११ अखेर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची प्राथमिक सेवाज्येष्ठतासुची प्रसिध्दीबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
क्र. प्रशा/७/कावि/७०७/२०१२
दिनांक १०/०८/२०१२

संदर्भ : १. प्रशासन विभागाकडील दिनांक ०७/०८/२०१२ चा मान्य प्रस्ताव

## आदेश

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर आरोग्य कार्यकारी अधिकारी या पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची दिनांक ३१/१२/२०११ अखेरची प्राथमिक सेवाज्येष्ठता सूची या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात येत आहे. त्यानुसार

१. सदर ज्येष्ठतासूची तयार करताना मुख्यत्वेकरुन महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ मधील तरतूदींचा अवलंब करण्यात आला आहे.
२. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८२ मधील नियम ३८ मधील तरतुदी, तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जन्म दि.- १०९५/प्र.क्र..२७/९५/१३-अ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ०३ मार्च १९९८ मधील मार्गदर्शक तत्वांनुसारच सेवानोंद पुस्तकात घेतलेल्या जन्म दिनांकाच्या नोंदी अंतिम समजनेत येतील.
३. सेवाज्येष्ठतासूची मध्ये आपले स्थान योग्य ठिकाणी आहे व सेवेची तारीख यथायोग्य आहे याची खात्री संबंधितांनी करणे आवश्यक असल्याने सदर प्राथमिक ज्येष्ठतासूची मधील नमुद अधिकाऱ्यांचे नावाबाबत जात, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, सध्याच्या पदावरील रुजू तारीख, सेवेतील रुजू तारीख, सेवेतील नेमणुकीचे पद, नियुक्तीचा मार्ग, सेवाज्येष्ठता क्रम अथवा सेवाज्येष्ठता सूचीमध्ये नाव नसले बाबत काही आक्षेप असल्यास त्या बाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करुन ही प्राथमिक ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत योग्य त्या पुराव्यासह सादर करावा.
४. आक्षेप मुदतीत सादर न केल्यास किंवा आक्षेपा सोबत योग्य ते पुरावे सादर न केल्यास अशा अपुर्ण आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.
५. सर्व विभागीय शाखाप्रमुखांना कळविण्यात येते की ही प्राथमिक ज्येष्ठतासूची त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ बजावून त्यांना प्रत मिळाले बाबत दिनांकित स्वाक्षांकित पोहोच सादर करावी.
६. संबंधित अधिकाऱ्यांनी सादर केलेले आक्षेप शाखाप्रमुखांनी स्वयंस्पष्ट शिफारशीसह/ अभिप्रायासह व अधिकाऱ्यांने सादर केलेल्या पुराव्यांची खातरजमा करुनच आवश्यकता असलेस सेवानोंद पुस्तकातील नोंदीसह सर्व पुरावे सत्यप्रतीकरुन विहीत मुदतीत प्रशासन विभागाकडे सादर करावे.
७. प्राथमिक ज्येष्ठतासूची प्राप्तच झाली नाही किंवा मुदतीत आक्षेप सादर करुनही शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाज्येष्ठता सूची प्रसिध्दी नंतर काही विवाद निर्माण झाल्यास या बाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांवर निश्चित करण्यात येईल.
८. या प्राथमिक ज्येष्ठतासूचीत काही वास्तविक चुका असल्यास उदा. नाव समाविष्ठ न केले असता अथवा आडनावात, आद्याक्षरात, जन्मतारखेत चुका आढळून आल्यास त्या विभागीय शाखाप्रमुखांनी निदर्शनास आणाव्यात म्हणजे ज्येष्ठता सूची अंतिम करताना त्या दुरुस्त करण्यात येतील.

९. ही प्राथमिक ज्येष्ठतासूची मे. न्यायालयात दाखल केलेल्या अन्य कोणताही विशेष निर्वानी अर्ज / याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या ज्येष्ठतासूचीत बदल करावा लागेल त्या निर्णयाच्या अधीन राहून असेल.

१०. सदर प्राथमिक सेवाज्येष्ठतासूची आदेश व ज्येष्ठतासुची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति, संबंधित अधिकारी

प्रत,

१. सर्व संबंधित शाखाप्रमुख

२/- संबंधितांना सदरची सेवाज्येष्ठता सूची मिळालेबाबतची दिनांकीत स्वाक्षांकित पुर्तता अहवाल आठ दिवसांत सादर करावा.

२. लेखा विभाग

३. मुख्य लेखा परिक्षण विभाग

४. प्रशासन टेबल क्र. १, १२, १३

५. प्रशासन संगणक कक्ष

२/- योग्य त्या नोंदी कामी

प्रशासन अधिकारी (तपासणी)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

## आरोग्य कार्यकारी अधिकारी पदाची दिनांक ३१/१२/२०११ अखेरची प्राथमिक स्वरुपाची सेवाज्येष्ठता सूची

**वेतनश्रेणी :- १५,६००-०-३९,१०० ग्रेड वेतन :- ६६००**

| अ.क्र. | संगणक क्र | अधिका-याचे नाव | जात | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | आरोग्य कार्यकारी अधिकारी रुजु तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नत/ सरळसेवा/ मर्यादीत विभागीय परिक्षा) | मनपामध्ये कामास लागलेचे पद | मनपामध्ये कामास लागलेचे तारीख | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५००१ | चव्हाण राजाराम भैरु | मराठा | खुला | बी.ए., आरोग्य निरिक्षक कोर्स | ०९/०३/१९५६ | १७/१२/२००७ | पदोन्नती | आरोग्य निरिक्षक | १०/०८/१९८१ | ३१/०३/२०१४ | |

प्रशासन अधिकारी, तपासणी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८